दिनांक २६ जानेवारी, २०२० रोजी
ध्वजारोहन कार्यक्रमापुर्वी भारताच्या
संविधानामधील उद्देशिका / Preamble
याचे सामुहिक वाचन करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांका संकिर्ण २०२०/प्र.क्र.२५/आस्था-५**
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.
तारीख: २२ जानेवारी, २०२०

**शासन परिपत्रक :-**

भारताची राज्यघटना दिनांक २६ नोव्हेंबर ,१९४९ रोजी स्वीकारण्यात आली . या निमित्ताने प्रत्येक वर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो . संविधान दिनांक २६ जानेवारी,१९५० पासून अंमलात आले असून भारतीय संविधानाची पुरेशी माहिती नागरिकांना असणे आवश्यक आहे . भारतीय राज्य घटनेतील मुलतत्त्वांची व्याप्ती व सर्व समावेशकता सर्व नागरिकांना समजावी आणि त्याचबरोबर घटनेतील न्याय, स्वातंत्र्य, समानता व बंधुता ही मुलतत्वे समाज मनावर कोरली जावीत यासाठी संविधानाचा परिपूर्ण परिचय नागरिकांना होणे आवश्यक आहे . भारतीय संविधानातील मुलतत्त्वे, संवैधानिक हक्क आणि कर्तव्ये स्वतंत्र भारताच्या नागरिकांना संस्कारित करणारी असून नागरिकांच्या मनात याची रुजवणूक झाल्यास जबाबदार, सुजाण व सुसंस्कृत नागरिक घडविण्यास मदत होईल.

२. त्यामुळे दिनांक २६ जानेवारी, २०२० पासून दरवर्षी होणाऱ्या ध्वजारोहन कार्यक्रमापुर्वी भारताच्या संविधानामधील उद्देशिका (सरनामा) / Preamble याचे सामुहिक वाचन करण्यात यावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००१२०१३११०८७४२० असा आहे . हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

सातारा जिल्हा परिषद
ग्रामपंचायत विभाग
6
23 JAN 2020
अधीक्षक
सहा.ग.वि.अ./उप मु.का.अधि(ग्रा.पं.)

PANDIT KAHANDERAO JADHAV

Digitally signed by PANDIT KAHANDERAO JADHAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=130c3faa5ebf 38c8b39058785ac534c 7d9b3 77a1b84b0b4d581d63ea56de06, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=f5c40942371a6969188d4d7e802128ea 5f7a1f648272d930e17fe1f86ad5cc76, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PANDIT KAHANDERAO JADHAV
Date: 2020.01.22 15:14:17 +05'30'

(पं. खं. जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

१. विभागीय आयुक्त, सर्व विभाग,
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद,
३. गट विकास अधिकारी, सर्व पंचायत समिती.

गट विकास अधिकारी, सर्व पंचायत समिती यांना सुचित येते की, सदर बाब सर्व ग्राम पंचायतींच्या निदर्शनास आणण्यात यावी.

जा.क्र.ग्राप-७/कावि-७११/2020
ग्रामपंचायत विभाग
दि. 23/1/2020

प्रति,
गट विकास अधिकारी
पंचायत समिती - सर्व (~~सर्व~~ जि.सातारा)
उपरोक्त शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनांची दरवर्षी अंमलबजावणी करणेबाबत आपले विकास गटातील अधिनस्त सर्व ग्रामपंचायती व इतर कार्यालये यांना तात्काळ सूचना द्याव्यात.

(sd)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं.)
for जिल्हा परिषद सातारा.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# संविधान दिवस

(दि.२६ नोव्हेंबर)

# भारताचे संविधान

# उद्देशिका

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय,
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आवश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत: प्रत अर्पण करीत आहोत''